# छंद पुष्परचनेचा - १२



मुक्त रचनेमध्ये ड्राय अरेंजमेंट म्हणजे वाळलेल्या पाना-फुलांपासून केलेल्या पुष्परचना हा आणखी एक प्रकार सांगता येईल. ताजी फुले व पाने वापरून केलेल्या रचनांची माहिती आपण गेली वर्षभर घेतली. वाळलेली पाने (सायकस, नारळ, फर्न, मेपल, पाईन, इ.), फुले (स्टॅटिस, गुलाब, लागस्पर, शेवंती, इ.), कणसे, काड्या, बांबू, वेलीच्या छान वळणदार फांद्या, पाईनचे कोन, अनेक प्रकारच्या शेंगा, गवत अशा अनेक गोष्टींचा उपयोग करून रचना करता येतात.

अशा तऱ्हेच्या रचनांचे खूप मोठे शास्त्र विकसित झालेले आहे. अनेक लोक ह्या वाळलेल्या पाना-फुलांचा व्यवसाय करतात. या रचनांमध्ये सर्व साहित्य वाळलेले असल्यामुळे पीन होल्डर किंवा ओॲसिस (फ्लोरल स्पंज) मध्ये रचना लावली तरी पाण्याची गरज नसते. अमेरिकेमध्ये ड्राय फ्लॉवर्सच्या रचनांसाठी वेगळा फ्लोरल फोम किंवा स्पंज मिळतो. या रचना पुष्कळ दिवस राहू शकतात.



अशा तऱ्हेच्या रचना करण्यासाठी फुले, पाने वाळवण्याचे वेगळेच तंत्र आहे. त्याची थोडक्यात माहिती घेऊ.

मायक्रोवेव्हमध्ये वाळवणे किंवा एअर ड्राईंग किंवा मोठ्या ओव्हनमध्ये वाळवणे आणि प्रेस पद्धतीने वाळवणे अशा काही पद्धती आहेत.

घरच्या घरी करायची सोपी पद्धत म्हणजे एअर ड्राईंग. यामध्ये गुलाबाची फुले, कोणतीही कणसे, गवत, स्टॅटिसचे तुरे वारा लागेल अशा कोरड्या जागेत दोरीला उलटे टांगून ठेवावेत. वाऱ्यावर उलटे टांगल्यामुळे हे हळूहळू वाळत जाते व त्याचे दांडे सरळ राहतात. सावलीत वाळवल्याने बरेचदा रंग आहे तसा राहायला मदत होते. पाईनचे कोन किंवा मेपलची पाने फॉलच्या वेळी जमा करून ठेवावीत. मेपलची ओली पाने वहीत किंवा पुस्तकात घालून वाळवावीत. पाईनच्या कोनाला दांडे लावून ते फुलांप्रमाणे रचनेमधे वापरावेत.







कित्येक वेळा या वाळलेल्या फुला-पानांना रंग देण्याची पद्धत आहे. वर दिलेल्या रचनांमधे याचा वापर केला आहे. ॲक्रेलिक कलरचे स्प्रे वापरून घरच्या घरी सोनेरी, चंदेरी किंवा आपल्या आवडीप्रमाणे रंगवता येते. कित्येक वेळा बाजारात असे रंगवलेले साहित्य मिळते.

सोबत दिलेली रीथ कित्येक वेळा बाजारात उपलब्ध असते.



इकेनोबो स्कूलच्या ज्या पारंपारिक रचना आहेत त्यात कुठेही वाळलेले साहित्य वापरले जात नाही. फक्त मुक्तरचनेमध्ये याचा वापर केला जातो. काही वेळा थोडे फ्रेश मटेरिअल व थोडे वाळलेले असे एकत्रित वापरुनही रचना करता येतात.

प्रेस फ्लॉवर्स वापरुन अतिशय सुंदर भेटकार्ड बनविता येतात. कलात्मक मेणबत्त्या तयार करताना सुद्धा याचा वापर केला जातो.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
**इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर**
asdssd@gmail.com